INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# महाराष्ट्रातील गोंधळ लोककला व गोंधळाचे महत्व
## (Gondhal Folk Art of Maharashtra and its Importance)

**सुदर्शन सुभाष सगट**

संशोधक विद्यार्थी,

समाजशास्त्र अधिविभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

E-mail: sudarshan3636@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/09.2022-92712866/IRJHIS2209002**

***गोषवारा:***

*महाराष्ट्रात 'गोंधळ' एक धार्मिक विधी म्हणून प्रचलित आहे, परंतु 'गोंधळ' हा केवळ एक धार्मिक विधी नसून समृद्ध लोककलेच्या परंपरेतील समाजमनावर दीर्घकाळ प्रभाव टाकणारी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. प्रस्तुत शोध निबंधात गोंधळाकडे फक्त एक धार्मिक विधी म्हणून न बघता समाजातील प्रभावी लोककला म्हणून गोंधळाचे स्पष्टीकरण मांडण्यात आले आहे. प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित असल्यामुळे संशोधकाने अर्थनिर्वचनाच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केली आहे. तसेच या मांडणीच्या आधारावर असा निष्कर्ष मांडला आहे की, भारतीय समाजात विशेषतः महाराष्ट्रात, गोंधळ हा उपासना प्रकार एका धार्मिक विधीपुरातच मर्यादित नसून अप्रत्यक्षपणे गोंधळातून समाजीकरण व सामाजिक नियंत्रण यासारख्या प्रक्रियेस हातभार लागतो. त्याचबरोबर गोंधळ ही धार्मिक व्यासपीठावरून समाजप्रबोधन करणारी एक प्रभावी संस्था आहे.*

***मुख्य शब्द:*** *गोंधळ, लोककला, समाजीकरण, सामाजिक नियंत्रण, समाजप्रबोधन*

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून मानवी संस्कृतीत लोककलांना विशेष महत्व प्राप्त झालेले आहे, याचे कारण म्हणजे त्या समाजातील लोककलांमधून त्या समाजाची संस्कृती प्रतिबिंबित होत असते. लोककला या सामाजिक जीवनाच्या विविध पैलुंशी संबंधित असल्यामुळे जनमाणसात त्या अधिक लोकप्रिय असतात. फार प्राचीन काळापासून लोककलांना समाजामध्ये विशिष्ट महत्व आणि अर्थ प्राप्त झालेला असतो, त्यामुळे लोककला त्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेल्या असतात.

महाराष्ट्र हे लोककलांच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध असे राज्य आहे, तसेच महाराष्ट्रात अस्तित्वात असणाऱ्या लोककलांना फार प्राचीन इतिहास लाभलेला आहे. महाराष्ट्रातील लोककलांमध्ये विधीनाट्य हा एक अत्यंत लोकप्रिय प्रकार असून महाराष्ट्रात विधीनाट्याचे अनेक प्रकार अस्तित्वात असल्याचे दिसून येते,

विधीनाट्य म्हणजे, एखाद्या विशिष्ट विधीच्या किंवा सांस्कृतिक संदर्भाच्या बाबतीत अनेक धार्मिक विधी, नृत्य, नाट्य, गायन, संगीत इ. सह सादर होणारे लोकाविष्कार होय. या विधीनाट्य लोकाकालांमध्ये जागरण, गोंधळ, दशावतारी नाटक, भारुड, हातगा, लळीत, सुंबरान, पंचमी इ. चा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील 'गोंधळ' या उपासना विधी व लोककलेचा परिचय करून देण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**गोंधळ:**

महाराष्ट्राला लोकसंस्कृतीचा अखंड इतिहास लाभलेला आहे त्यामुळे महाराष्ट्रातील लोकसंस्कृती ही समृद्ध असल्याचे दिसून येते, अशा या लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी, पोतराज इ. लोकसांस्कृतिक संस्थांचा महत्वाचा वाटा आहे. हिंदू समाजाच्या पारंपारिक रचनेनुसार धर्मभावना जागृत ठेवणे, लोकदेवतासंबंधीची श्रद्धा अविचल राखणे, सामाजिक नीतीनियमांचे महत्व पटविणे इ. कामे या संस्थांकडून केली जातात. गोंधळ ही समाजात प्रतिष्ठा पावलेली संस्था आहे. तसेच लोकांच्या धार्मिक जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे.

गोंधळ म्हणजे काय? तो सर्वप्रथम कोणी घातला? का घातला? याविषयी गोंधळी समाजात पिढ्यानपिढ्या अनेक पुराणकथा, आख्यायिका प्रचलित आहेत, या कथेपैकी एक पुराणकथा प्रा. रामनाथ चव्हाण यांनी भटक्या-विमुक्तांची जातपंचायत, खंड ५ मध्ये वर्णिली आहे, ती पुराणकथा पुढील प्रमाणे- "एखादा तेहतीस कोटी देव आणि राक्षस यांच्यामध्ये प्रचंड भीषण युद्ध सुरवात होते. सर्व प्रयत्न करूनसुद्धा देवांवर राक्षस वरचढ होत होते, कारण ज्या राक्षसांचा वध देव करीत होते त्या राक्षसांना राक्षसांचे गुरु शुक्राचार्य हे संजीवनी मंत्राने तत्काळ जीवंत करीत होते, त्यामुळे राक्षसांचा पराभव काही केल्या होत नव्हता. देव खूप चिंताग्रस्त झाले, काय करावे हे देवांना सुचत नव्हते. अखेर देवांच्या लक्षात आले की, आपल्यामध्ये सर्वात शक्तिशाली देव शिव आहे परंतु त्यांच्यासोबत आदिशक्ती नाही, आदिशक्तिला मदतीला बोलावले तरच आपण या युद्धात विजयी होऊ. परंतु कसे बोलवावे हे देवांना समजत नव्हते. यासाठी देवांनी आदिशक्तिला मदतीला बोलविण्यासाठी गोंधळ घालायचे ठरविले आणि देव गोंधळाच्या तयारीला लागले. "आदिमाया शक्तिच्या पूजेसाठी (गोंधळासाठी) आवश्यक असलेले साहित्य देवांनी जमविले. पाच हळकुंडे, पाच खारका, पाच सुपाऱ्या, पाच लवंगा, पाच वेलदोडे आणि पंचवीस नागवेलीची पाने जमविली. शिवाय एक हात नवीन कापड, एक तांब्या, नारळ, समई, उदबत्ती, कापूर, हे साहित्य एकत्र करून देवांनी चौक भरला आणि नऊ दिवस, नऊ रात्र आदिमाया शक्तिच्या नावाने देवांनी गोंधळ सुरु केला. तेंव्हा नऊ दिवसानंतर आदिमाया शक्ति प्रकट झाली." देवांनी सर्व हकीकत आदिमायेला सांगितली आणि मदतीचे आवाहन केले. त्यावर तेहतीस कोटी देवांची विनंती ऐकून आदिमायेने तत्काळ राक्षसांवर

चाल केली आणि सर्व राक्षसांचा वध केला. तेंव्हापासून तेहतीस कोटी देवांमधील आपापसातील गोंधळ थांबला आणि तेथून पुढे आदिमाया शक्तिच्या नावाने तिच्या पराक्रमाचे आणि करुणेचे स्मरण व्हावे म्हणून गोंधळ घालण्याची प्रथा सुरु झाली.

गोंधळाच्या उत्पत्तीबाबतची आणखीन एक कथा म्हणजे, "गोंधळाची व्युत्पत्ती परशुरामांनी केलेल्या मातृवंदनेतून झाल्याचे म्हटले जाते. कथा अशी की, परशुरामांनी बेटासुर नावाच्या दैत्याचा वध करून त्याचे शिर कापले. त्याच्या नसा कापून त्याच्याच कवटीच्या रंध्रात ओवून त्या वाद्यांचा 'तिंतृण तिंतृण' असा आवाज करीत ते माता रेणुकेच्या जवळ आले व तिला वंदन केले. या वंदनेतूनच गोंधळाचा उगम झाला व या वाद्यास 'तुणतुणे' असे संबोधले जाऊ लागले. गोंधळी लोक, जमदग्नी ऋषी व रेणुका माता यांच्यापासून आपली उत्पत्ती झाली व 'माहुरगड' हे आपले मूळ स्थान आहे असे मानतात. मात्र, काही संशोधकांनी गोंधळ ही कला भूतमाता व तिच्या भक्तांशी संबंधित आहे असा दावा केला आहे. संशोधकांच्या मते, श्री तुळजाभवानीचा कालखंड इ. स. १००० पूर्वीचा आहे तर रेणुका माता त्याहूनही प्राचीन आहे. गोंधळात गायल्या जाणाऱ्या, रामदासांनी रचलेल्या आरतीत, 'कवडी एक अर्पिता देसी हार मुक्ताफळा हो' या ओळीतील 'कवडी' या चलनाचा संबंध येतो. कवडी हे चलन पाचव्या शतकाच्या दरम्यान कर्नाटकात प्रचलित होते. त्या वेळचे कदंब राजघराणे तुळजाभवानीला आपली कुलदेवी मानत होते. यावरून गोंधळ प्रथा तेव्हापासून प्रचलित असावी असाही संदर्भ दिला जातो. जन्म, लग्न, मुंज, गृहशांती, इ. प्रसंगी देवीचा गोंधळ घातला की आयुष्याचा गोंधळ होत नाही अशी धारणा होती. बहुतांशी समाजाचा कुळाचार असणारी एक प्रबोधक, मनोरंजक आणि महत्त्वपूर्ण परंपरा म्हणजे गोंधळ होय."

"गोंधळी हे तुळजाभवानी व रेणुकेचे उपासक आहेत ते स्वतःला जमदग्नी आणि रेणुकेचे वंशज समजतात. नांदेड जिल्ह्यातील 'माहूर' हे त्यांचे वस्तीस्थान असून लोकपरंपरेतील त्याची आख्यायिका पुढीलप्रमाणे: परशुरामाने बेटासुराचा वध करून त्याच्या मुंडक्याचे चौंडके करून ते वाजवून आपली माता रेणुकामातेला वंदन केले. त्यातून गोंधळाची प्रथा उगम पावली."

"गोंधळ हा एक नृत्यनाट्यात्मक देवीचा कुलाचार असतो. याचे स्वरूप गायन, वादन, नर्तन आणि नाट्यमय सादरीकरण या सर्व प्रकारचा मेळ साधून पार पाडलेल्या कुलाचाराचे असते. चार ते सहा गोंधळी मिळून हे विधीनाट्य सदर करतात. संबळ, तुणतुणे या वाद्यांच्या साथीने गोंधळी आधी गणेशाला आणि त्यानंतर अनेक देवदेवतांना रंगपीठावर येण्यासाठी आवाहन करतात, ते आले आहेत असा मानस-अनुभव घेवून भोवताली जमलेल्या भक्तभाविकांसमोर देवाची गाणी म्हणतात. या गाण्यात देवीचे रूपदर्शन, गुणवर्णन आणि लीलागायान असते. पूर्वार्धातील नमन, आवाहन, वंदन यानंतर एखादे पौराणिक किंवा लौकिक अख्यान लावून त्या अख्यानाचे सादरीकरण केले जाते आणि देवीच्या आरतीने गोंधळाची सांगता

केली जाते.”

“गोंधळाची परंपरा ७ व्या शतकापर्यंत शोधता येते. तुळजाभवानीची प्राचीनता इ. स. १००० पर्यंत शोधता येते. रेणुका ही त्याच्याही पूर्वीची आहे. महानुभावाच्या ‘मुर्तिप्रकाश’ या ग्रंथात असा उल्लेख आढळतो की,

बहुतांचा गोंधळी घडे निंदा राभ्यस्थळी

मग अभिमानाचा दावानळी पडती एकमेका ओवी क्र. २४१४

दासोपंतांच्या ‘गीतावर्ण’ ग्रंथात दृष्टांत रुपात पहिल्या अध्यायात २३९१ क्रमांकाच्या ओवीत गोंधळाचा उल्लेख सापडतो. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ इ. संतांच्या रचनेतही गोंधळाचे उल्लेख आले आहेत. याशिवाय महानुभावाच्या शिशुपालवध, रुक्मिणीस्वयंवर, सह्याद्रीवर्णन इ. ग्रंथातूनही गोंधळ प्रथेचा उल्लेख सापडतो. श्रीधरस्वामी नाझरेकरांच्या ‘अंबिकाउदय’ या ग्रंथातही गोंधळ या विधीनाट्याचे उग्ररूप यथार्थपणे वर्णिले आहे.”

गोंधळ हा नृत्यप्रकार आणि उपासना प्रकार हा भारतात प्रसिद्ध असला तरी ठिकठिकाणी गोंधळ घालण्याची पद्धती, गोंधळामागील श्रद्धा, विश्वास यामध्ये विविधता आढळून येते. विविध अभ्यासकांनी गोंधळाचे वर्णन आपापल्या पद्धतीने केलेले आहे, परंतु प्रस्तुत संशोधन महाराष्ट्र राज्यातील ‘गोंधळ’ या लोककलेशी असल्यामुळे महाराष्ट्रात प्रचलित असणारे गोंधळाचे स्वरूप जाणून घेणे महत्वाचे आहे, म्हणून विविध अभ्यासकांनी गोंधळ या नृत्य व उपासना प्रकारच्या केलेल्या वर्णानातून गोंधळ ही संकल्पना समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

‘गोंधळ’ हे शक्तीपुजेचे विधीनाट्यात्मक उपासना नाट्य होय. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे ही महाराष्ट्रातील विविध जातीजमातींची कुलदैवते आहेत. या कुलदैवातांचा कुलधर्म म्हणजे ‘गोंधळ’ घालणे होय. गोंधळ हा नृत्यप्रकार आणि उपासना प्रकार हा फार प्राचीन काळापासून भारत देशात प्रचलित असून महाराष्ट्रात गोंधळ या उपासना प्रकाराला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. प्राचीन काळात देवलोक आणि पृथ्वीलोकावर आलेलल्या संकटावर मात करण्यासाठी गोंधळाच्या माध्यमातून देवीदेवतांना विशेषतः आदिशक्तीला प्रसन्न करण्याची परंपरा सांगितली जाते, परंतु कालानुरूप गोंधळाच्या श्रद्धा, विश्वास, स्वरूप यामध्ये परिवर्तन झालेले दिसून येते. प्राचीन काळापासून चालत आलेले गोंधळी नृत्य ‘अमलिका ग्राममहात्म्य’ म्हणजे माहूर ग्राममहात्म्यात गोंधळी नृत्य सादरीकरणाचे आलले वर्णन व आजच्या सादरीकरणाचे वर्णन लक्षात घेतले तर गोंधळ सादरीकरणाच्या पद्धतीत काळ व परिस्थिती सापेक्ष होत गेलेल्या बदलांचे चित्र आपणास दिसेल. “शुभदिवस पाहून कवड्यांच्या माळा घालून आणि दिवटी घेऊन गोंधळ घालावा. गोंधळ ज्या ठिकाणी घालायचा त्या ठिकाणी सर्व मंडळीना आमंत्रित

करावयाचे असते. ती सभा देव, राक्षस आणि माणूस गण अशा तीन प्रकारची असू शकते. गोंधळास दीपिका, कपर्दिक, माळा, मातृवाद्य, टाळ, वंशवाद्य, मृदुंग, चिपळी, चंडक, वीणा, सुरज इ. वाद्यांची जरुरी असते. तसेच अनेक दिवट्या व कवड्यांच्या माळा लागतात. गोंधळीवृंदाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन भेद कल्पून उत्तम वृदांत चार मुख्य गायक, आठ समगायक, आठ नर्तक, चार वांशिक, चार मृदंगिक आणि चार तालधारी अशी बत्तीस माणसे असतात. मध्यम वृंदात निम्मे म्हणजे सोळा आणि कनिष्ठ वर्गात निम्मी म्हणजे आठ माणसे असावीत, यापेक्षा कमी असू नयेत, असा कटाक्ष आहे. गोंधळी नृत्यात अशाप्रकारे बत्तीस माणसांचा अंतर्भाव असल्याने त्यांना नृत्यांगणही तसेच मोठे लागते. पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर सात-सात हात अशी वर्तुळाकार भूमी नृत्याकरिता पसंत करावी. नृत्य कसे करावे, कोणी कोठे उभे राहावे, दिवट्या कोणी घ्यावात, वाद्ये कोणकोणती कोणी घ्यावीत, गोंधळास चांगली वेळ कोणती याबद्दल निश्चित संकेत आहेत." 'गोंधळ' विधीनाट्य मांडणारे ते गोंधळी. गोंधळी ही आता स्वतंत्र जमात म्हणून गणली जाते. भटक्यांमध्ये त्यांचा समावेश केलेला असला तरी 'गोंधळ' अर्थात गोंद+वल्ल, नियमित उपासना करण्यासाठी अनेक जातीजमातीतून व्रतस्त उपासक पुढे येऊन त्यातून ही जमात निर्माण झाली असण्याची शक्यता आहे.

'गोंधळ' या उपासना विधीनाट्याची विशिष्ट अशी मांडणी असते, ही मांडणी विधिवत असावी असा आग्रह गोंधळी लोकांकडून धरला जातो. गोंधळाची पूर्वतयारी करताना, "चौरंग त्याला ऊस, ज्वारीच्या किंवा बाजरीच्या ताटांचे उभे वर एकत्र शेंडे बांधून केलेले मखर, चौरंगावर वस्त्रे, कलश, देवीचा टाक किंवा मूर्ती, सुपारी, विडे, फळे, कवड्यांची माळ, आहार किंवा कडाकन्या, हार मखराला बांधणे, धान्य, फुले, तांदूळ, नैवेद्य इ. पूजासामग्री, असते. पोत जाळण्यासाठी स्वतंत्र एक प्रकारचा तेंभ्यासारखा पोत असतो, त्यास पोत उजळणे म्हणतात. गोंधळ संपेपर्यंत यजमान तेलाने पोत उजळत राहतो. गोंधळी उपसाकांचा चार, सहा, आठ, बारा, सोळा, बत्तीस (जास्तीतजास्त) जणांचा चमू असतो. यात स्त्री नसते. संबळ वाजविणारा, झांजा वाजविणारा, तुणतुणे वाजविणारा व अन्य वाद्ये, खंजिरी इ. वाजविणारे असू शकतात. त्यांच्या उभ्या राहण्याच्या जागा ठरलेल्या असतात. मुख्य गोंधळी गळयात टाक आणि प्रामुख्याने कवड्यांच्या माळा परिधान केलेला असतो. पागोटे, कवड्यांच्या माळा, गुडघ्यापर्यंत चुडीदार-बाराबंदी सारखा अंगरखा, धोतर, कपाळाला कुंकू असा त्याचा पोशाख असतो. एका हातात चिपळया घेऊन तो नाचून गाणे म्हणतो, पायात प्रसंगी घुंगरू बांधलेले असतात. गिरक्या मारून नाचाची प्रथा असते. संबळाच्या तालावर पारंपारिक गोंधळीगीते गात, नमन, गण, आवाहन (गोंधळला यावे), देवीची स्तुतीपर गाणी, देवीभागवत किंवा देवी महात्म्यातील कथागीत व त्यावर वगनाट्य अर्थात कथाकीर्तन सादरीकरण, पूर्वरंग, उत्तररंग, त्यात जमेल तसे श्रद्धा न सांडू देता रंजनात्मक संवाद इ. रात्रभराचा जागर, ओझे

उतरविण्याचा विधी इ. गोष्टी केल्या जातात. प्रामुख्याने यजमानाच्या कुलधर्मसिद्धीसाठी उपासक पुरोहित गोंधळी यांनी हे विधीनाट्य मांडलेले असते. यातील कथागीत हे ऐकीव लावणी-पोवाडा स्वरूपाचे असते. गोंधळात भेदिक कवणापासून शक्तीमहात्म्य जगविले जाते."

"महाराष्ट्रातील काही कुळांत प्रचलित असलेला एक कुलाचार म्हणजे गोंधळ होय. घरातील मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पडल्याबद्दल देवीची स्तुती व पूजा करून तिच्या उपकारस्तवनाचा हा विधी असतो. रेणुका, अंबाबाई व तुळजाभवानी या कुलदेवतांच्या नावाने गोंधळ घालण्याचा विधी महाराष्ट्रात मराठ्यांमध्ये व देशस्थ ब्राह्मणांमध्ये प्रचलित आहे. गोंधळी जातीचे लोक यजमानाच्या सांगण्यावरून गोंधळ घालण्याचा विधी पार पाडतात. गोंधळ घालण्यात कमीत कमी चारजण भाग घेतात. साथीसाठी व तुणतुणे वाजविण्यासाठी प्रत्येकी एक, गीत व कथा निरूपण करणारा एक मुख्य गोंधळी (नाईक) आणि अधूनमधून लोकांना हसविणारा त्यांचा एक सहाय्यक. पूर्वी गोंधळयांच्या अंगांत मलमलीचे अंगरखे, गळयात कवड्यांच्या माळा व डोक्यावर कंगणीदार पगड्या असत. एका पाटावर नवे वस्त्र ठेवून गोंधळी त्यावर कलशादी वस्तूंची विधिपूर्वक मांडणी करतो व गोंधळ बोलवणाऱ्या यजमानाच्या हस्ते देवीची प्रतिष्ठापना व पूजा करतो. गोंधळासाठी आवश्यक असलेली 'बुधली' व 'दिवटी' या वस्तू गोंधळी स्वतःच्या घरूनच सोबत आणतो. मुख्य गोंधळी गण म्हणून जगदंबेचे स्तवन करतो व नंतर अनेक देवतांना नावे घेऊन 'गोंधळासी यावे' असे आवाहन करतो. नंतर तो पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन विभागांत देवीचे गुणगान व एखादे संगीत अख्यान सांगतो. देवीच्या आरतीने गोंधळ संपतो. गोंधळात म्हटली जाणारी पदे, कथागीते व कथा या लोकसाहित्यातीलच असतात. मीठ—मिरचीचे भांडण, मांगिणीचे शिर, कोल्ह्याचे लगीन इ. अख्याने व कथा त्यांत प्रमुख होत."

"गोंधळ हा महाराष्ट्रातील जुनाच कलाप्रकार आहे. गोंधळ हा कलाप्रकार गोंधळी नावाची जातच स्वतंत्रपणे सदर करीत असते. गोंधळाचा ताफाही सुटसुटीत असतो. चार सहा जणांच्या सहाय्याने गोंधळ हा कलाप्रकार सादर केला जातो. याला वाद्यही कमी लागतात. संबळ, तुणतुणे, झांज ही वाद्य असली की लग्नमंडपात अथवा मंदिरात उभे राहून गोंधळ घातला जातो. देवदेवांतांची भक्ती हाच गोंधळाच्या प्रयोजनाचा भाग असतो. गोंधळाची एक विशिष्ट ढब असून वर्णनासाठी कथाभागही असतो. हा कथाभाग सादर करता करता अधून मधून अभिनयही करावा लागतो. या प्रकारात स्त्रियांची भाषणेही पुरुषच करून दाखवतात. गोंधळ प्रकारात थोडेसे गीतनाट्यही असते. कथानकाच्या शेवटी म्हणजे गोंधळ संपता संपताच आरतीही असते. आरती गोंधळीच करतात, परंतु नाच केलाच पाहिजे असा संकेत नाही म्हणजेच नाच काही गोंधळाचे प्रमुख अंग नाही."

"गोंधळाच्या पहिल्या भागाला पूर्वरंग म्हणतात. पूर्वरंगामध्ये मंडल, पूजाअर्चा, गणदेवतेची पूजा,

कुलदेवतेची पूजा, वेगवेगळ्या देवदेवतांना आवाहन, नंतर गोंधळाच्या मूळ देवतांची स्तुतीगीते गायिली जातात. दैवतपर, मनोरंजनपर, गाणी गायिली जातात. गोंधळाच्या प्रारंभी, 'तुळजापूरच्या भवानीमाते, गोंधळाला यावे' असे आवाहन करण्याची प्रथा आहे. त्यानंतर इतर देवदेवतांना आवाहन करण्यात येते. गोंधळाच्या दुसऱ्या भागाला उत्तररंग असे म्हणतात. यात एखादी लोककथा, पुराणकथा, इतिहास कथा किंवा एखादी सामाजिक कथा घेऊन गोंधळ केला जातो."

"गोंधळी जमातीच्या संस्कृतीत गोंधळ या विधीला अनन्य साधारण महत्व आहे. सुरवातीला गोंधळ हा विधी देशस्त ब्राह्मण आणि मराठा समाजातील विवाह आणि पाळणा समारंभात अनिवार्य होता परंतु नंतच्या काळात गोंधळ हा समाजातील सर्व श्रेष्ठ-कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींमध्ये प्रचलित झाला. लग्नाचे सर्व विधी पूर्ण झाल्यावर गोंधळ घातला जात असे, गोंधळात प्रामुख्याने भवानी, मल्हारी, खंडोबा (शंकराचे रूप), महालक्ष्मी या देवीदेवतांना आव्हान केले जाते. गोंधळ हा केवळ एक धार्मिक विधी नसून यामध्ये स्थानिक, समाजिक समस्या याबाबत जनजागृती करणारी गाणी गायिली जातात. गोंधळ सादर करणाऱ्या लोकांना फक्त धार्मिक ज्ञान तर असतेच त्याचबरोबर त्यांना प्रस्थापित समाजाची संस्कृती, समाजातील सामाजिक संस्था, समाजातील भेदक सामजिक समस्या, विविध समाजसुधारक तसेच स्थानिक, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकारण यांचे सखोल ज्ञान असल्याचे गोंधळातून दिसून येते, त्यामुळे गोंधळ हा एक धार्मिक विधी नसून समाजप्रबोधन करणारी एक प्रभावी संस्था आहे."

"गोंधळयांच्या गाण्यात केवळ आध्यात्मिक आणि भक्तिपर कवने असतात असे नाही तर या कवणाबरोबर लौकिक आशयाची कवनेही असतात, त्यातून प्रामुख्याने समाजाला उपदेश करण्याचा प्रयत्न होतो. रंजनपर गाणीदेखील गोंधळी मधूनमधून गातात. थोडक्यात, म्हणजे गोंधळयांच्या कवनात आध्यात्मिक उपसानाप्रधान, लौकिक, प्रबोधनात्मक आणि रंजनपर असे विविध प्रकार असतात."

**चर्चा व निष्कर्ष:**

वरील मांडणीवरून असे म्हणता येईल की, गोंधळ ही महाराष्ट्राची प्रभावी लोककला आहे जी समाजातील प्रत्येक वर्गात प्रचलित आहे. तसेच गोंधळ हा साधारण जनमाणसात अतिशय लोकप्रिय असणारी संस्था मानली गेली आहे. गोंधळाच्या सादरीकरणात पारंपारिक लोककलेतील देवीच्या स्तुतीची गाणी, विविध देवी-देवतांच्या कथांचे गुंफण करणारी गाणी, चांगल्या गोष्टींचे महत्व वर्णन करणारी पदे, समाजसुधारक, वीरांचे विक्रमपर आधारित पोवाडे, ग्रामीण लोकजीवनातील वास्तवावर उपरोधिक भाषेत प्रकाश टाकणारी कवणे, त्याबरोबर नृत्य, नाट्य, संवाद, बतावणी या सर्वांचा एकत्रीकरण करून जे सुंदर नाट्य उभे राहते त्यास 'गोंधळ' म्हणतात.

भारतीय समाजात विशेषतः महाराष्ट्रात, गोंधळ हा उपासना प्रकार एका धार्मिक विधीपुरातच

मर्यादित नसून अप्रत्यक्षपणे गोंधळातून समाजीकरण व सामाजिक नियंत्रण यासारख्या प्रक्रियेस हातभार लागतो. त्याचबरोबर गोंधळ ही समाजप्रबोधन करणारी एक प्रभावी संस्था आहे. याचे कारण म्हणजे गोंधळ सादर करण्याची धार्मिक पद्धत होय. गोंधळ सादर करण्याच्या धार्मिक पद्धतीतून समाजसभासदाने कशा प्रकारे आदर्श वर्तन करावे याबाबतचे आवाहन केले जाते. म्हणजेच समाजसभासदांच्या आदर्श वर्तनाबाबत गोंधळ ही संस्था अपेक्षा ठेवते. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा, देवीदेवता इ. महत्वाचे स्थान आहे आणि आजच्या आधुनिक काळातही हे महत्व भक्कमपणे टिकून असल्याचे दिसून येते, त्यामुळे धार्मिक व्यासपीठावरून केलेले संस्कार हे भारतीय समाजाकडून सहजपणे आचरणात आणले जातात, म्हणून धार्मिक व्यासपीठाचा आधार घेऊन केलेले प्रबोधन हे समाजमनावर दीर्घकाळ टिकून राहते, म्हणूनच गोंधळ हा एक धार्मिक विधी नसून धार्मिक व्यासपीठावरून समाजावर व्यापक प्रभाव टाकणारी संस्था आहे, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भसूची:**

१) चव्हाण, रामनाथ: भटक्या-विमुक्तांची जातपंचायत, खंड: ५, २०१३, पृ.क्र. १६२

२) http://www.loksatta.com/chaturang-news/plight-of-gondhali-community-1071587/

३) वाडकर धोंडीराम: गोंधळयांचे लोकसाहित्य, २००८, पृ. क्र. २७

४) मांडे, प्रभाकर: लोकगायकांची परंपरा, पृ. क्र. १०४

५) वाडकर, धोंडीराम: गोंधळयांचे लोकसाहित्य, २००८, २०१३, पृ. क्र. २७

६) मोरजे, गंगाधर: लोकसाहित्य आकलन आणि आस्वाद, १९९३, पृ. क्र. ४१

७) सहस्त्रबुद्धे, अनिल: लोककला, २०१७, पृ. क्र. ९८, ९९

८) https://marathivishwakosh.org/

९) जाधव, सुदाम: आदिवासी लोकरंगभूमी, पृ, क्र. १९

१०) पाखमोडे, संजय: २०१७, महाराष्ट्रातील लोकनाट्य: गोंधळ, पृ. क्र. १७०

११) कृष्णामचारी, सौगंथी: On the Gondhala music of Maharashtra,२०१८, पृ.क्र.३

१२) मांडे, प्रभाकर: लोकगायकांची परंपरा, पृ. क्र. १११